# तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय, मुळशी.

दुरध्वनी क्र.-०२०-२२९४३१२१ E-Mail- tahsildarmulshi@gmail.com


*******************************************

जा. क्र. जमिन/एसआर/२२२/१९
पौड, दिनांक ०४ /०१/२०२०

प्रति,

गाव कामगार तलाठी ताथवडे
ता. मुळशी जि. पुणे

विषय :- जमिन अकृषिक झाल्याची नोंद संबधित जमिनीच्या गाव नमुना ७/१२ सदरी घेणेबाबत.
मौजे ताथवडे, ता. मुळशी, पुणे येथील जमीन स.नं./ग.नं. १०५, क्षेत्र १ हे. १३ आर बांधकाम रेखांकन नकाशात सामाविष्ट क्षेत्र ११३०० चौ. मी. रस्त्याखालील क्षेत्र ५२१.२१ चौ. मी. उर्वरित १०७७८.७९ चौ. मी. क्षेत्रापैकी ६१३.४७ चौ. मी. वाणिज्य क्षेत्रास व १०१६५.३२ चौ. मी. निवासी क्षेत्रास महाराष्ट्र जमिन महसुल संहिता १९६६ मधील सुधारणा करीता अध्यादेश २०१७ नुसार कलम ४२ ब मधील तरतुदीनुसार अकृषिक सारा आकारणी करुन मिळणेबाबत..

तहसिल कार्यालय ★ मुळशी ★ (पौड)

संदर्भ - १. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ यात आणखी सुधारणा करण्याकरीताचा दिनांक ०५/०१/२०१७ चा अध्यादेश.
२. पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी पुणे १८ यांचे कार्यालयाकडील पत्र क्रं बीपी/एनए/ताथवडे/४१/१०३९/१९ दि.२१/१२/१९

२/- उपरोक्त नमुद विषयान्वये, महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग यांचेकडील दिनांक ०५/०१/२०१७ रोजीचा अधिसुचनेच्या अनुषंगाने मौजे ताथवडे, ता. मुळशी, पुणे येथील जमीन स.नं./ग.नं. १०५, क्षेत्र १ हे. १३ आर बांधकाम रेखांकन नकाशात सामाविष्ट क्षेत्र ११३०० चौ. मी. रस्त्याखालील क्षेत्र ५२१.२१ चौ. मी. उर्वरित १०७७८.७९ चौ. मी. क्षेत्रापैकी ६१३.४७ चौ. मी. वाणिज्य क्षेत्रास व १०१६५.३२ चौ. मी. निवासी प्रयोजनार्थ अकृषिक वापराकरीता वर्ग एक च्या विनिश्चीती करीता पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी पुणे यांचे कार्यालयाकडील पत्र क्रं बीपी/एनए/ताथवडे/४१/१०३९/२०१९ दिनांक २१/१२/२०१९ अन्वये अर्जदार मे. रोशन रियल्टी तर्फे प्रो. प्रा. श्री. राहुल भगवानदास सांकला रा. हाईड पार्क, मार्केट यार्ड, पुणे ३७ यांचा दि. १८/१२/२०१९ रोजीचा अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

अर्जदार यांनी विनंती केलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | गावाचे नाव | तालुका | सर्व्हे/गट/सिटी सर्व्हे नं. |
|---|---|---|---|
| १ | ताथवडे | मुळशी | १०५ |

| अ.क्र | जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं. | ७/१२ नुसार एकुण क्षेत्र (हे. आर) | बांधकाम/रेखां. परवानगी दयावय क्षेत्र (चौ.मी) |
|---|---|---|---|---|
| | | | | ११३००.०० |
| १ | मे. रोशन रियल्टी तर्फे प्रो. प्रा. श्री. राहुल भगवानदास सांकला व इतर | १०५ | १.१३.०० | |
| | एकुण क्षेत्र | | १.१३.०० | ११३००.०० |
| २ | अर्जदार यांनी सुधारित बांधकाम रेखाकंन नकाशात समाविष्ट केलेले क्षेत्र ७/१२ नुसार | | | ५२१.२१ |
| ३ | प्रादेशिक योजनेतील रस्त्याखालील क्षेत्र | | | १०७७८.७९ |
| ४ | रेखांकन नकाशामध्ये समाविष्ठ करण्याचे निव्वळ क्षेत्र | | | १०७७८.७९ |
| ५ | सद्यस्थितीमध्ये अकृषिक आकारणे करणेचे क्षेत्र | | | रेखांकनाचे प्रयोजन |
| | | | वाणिज्य | ६१३.४७ |
| | | | निवासी | १०१६५.३२ |
| | | | | |

प्रकरणी या कार्यालयाकडील पत्र जा. क्र जमिन/एन ए/एस आर/२२२/२०१९ दिनांक २४/१२/२०१९ अन्वये खालीलप्रमाणे अकृषिक सारा, रुपांतरण कर तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकिय देणे शासन जमा करणेबाबत अर्जदार यांना कळविणेत आलेले होते.

| अ.क्र | अकृषिक आकारणीचा तपशील | तपशील |
|---|---|---|
| १ | बिगरशेती करावयाचे क्षेत्र (चौ.मी.) | १०७७८.७९ |
| २ | निवासी प्रयोजनासाठी बिगर शेती करावाचे क्षेत्र | १०१६५.३२ |
| | बिनशेती आकारणीचा दर रुपये (प्रति/चौ.मी.) (निवासी प्रयोजन) | ०.४०८ |
| | बिनशेती करावयाच्या क्षेत्रावरील वार्षिक आकारणी रक्कम रुपये | ४१४७.४५ |
| ३ | रुपांतरीत कराची आकारणी रक्कम रुपये | २०७३७.२५ |
| ४ | एकुण | २४८८४.७० |
| ५ | वाणिज्य प्रयोजनासाठी बिगर शेती करावाचे क्षेत्र | ६१३.४७ |
| | बिनशेती आकारणीचा दर रुपये (प्रति/चौ.मी.) (वाणिज्य प्रयोजन) | ०.८१६ |
| | बिनशेती करावयाच्या क्षेत्रावरील वार्षिक आकारणी रक्कम रुपये | ५००.५९ |
| ६ | रुपांतरीत कराची आकारणी रक्कम रुपये | २५०२.९५ |
| ७ | एकुण | ३००३.२४ |
| ८ | जिल्हा परिषद कर रक्कम रुपये | ०० |
| ९ | ग्रामपंचायत कर रक्कम रुपये | ०० |
| १० | एकूण रक्कम रुपये. | २७८८७.९४ |

त्यानुसार वरीलप्रमाणे नमुद अकृषिक सारा, रुपांतरण कर तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी शासन जमा केलेबाबत अर्जदार यांनी डिफेस्ड चलन क्र GRN No MH ०००५१५०२४९२०१९२० दिनांक २७/१२/२०१९ या कार्यालयास सादर केले आहे.

तसेच विषयांकित मिळकतीवरील रेखांकन/बांधकाम नकाशास पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पत्र क्रं बी.पी/ताथवडे/४१/२०१९ दिनांक २०/०६/२०१९ अन्वये दिलेला प्रारंभपत्राची व बांधकाम नकाशाची प्रत सादर केलेली आहे.

सबब, आपणास या पत्रान्वये कळविणेत येते की, महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग यांचेकडील दिनांक ०५/०१/२०१७ रोजीचा अधिसुचनेच्या अनुषंगाने विषयांकीत नमुद मिळकत अकृषिक झालेबाबतची योग्य ती नोंद नमुद मिळकतीचे ७/१२ सदर घेण्याकामी तसेच त्यानुसार गाव नमुना नं २ दुरुस्त अधिकार अभिलेखाची प्रत व फेरफार अर्जदार उपलब्ध करुन देणेबाबत आपणांस सुचित करणेत येत आहे. तसेच विषयांकित मिळकत अकृषिक झालेबाबतची नोंद नमुद मिळकतीचे ७/१२ सदरी व गाव नमुना नं २ ला झालेबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सही/-xxx
(अभय चव्हाण)
तहसिलदार मुळशी (पौड)

प्रत :- मे. रोशन रियल्टी तर्फे प्रो. प्रा. श्री. राहुल भगवानदास सांकला रा. हाईड पार्क, मार्केट यार्ड, पुणे ३७ यांना माहितीस्तव रवाना.

प्रत :- कार्यकारी अभियंता बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे १८ यांना माहीतीस्तव रवाना.

तहसिल कार्यालय मुळशी (पौड)

(अभय चव्हाण)
तहसिलदार मुळशी (पौड)